# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/11/2022 (बुधवार) सकाळ

## चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत आवरा प्लास्टिक कपनी, एमआयडीसी बोरी येथे दिनांक २२/११/२०२२ चे १३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रसींजीत तपन खांगराई, वय ३२ वर्ष, रा. काजी चौक, ता. डेबरा, मदनीपुर (प. बंगाल) ह. मु. आवरा प्लास्टीक कंपनी एमआयडीसी बोरी, ता. हिंगणा जि. नागपुर याने सेंट्रल बँक टेंभरी येथुन २३,०००/– रू. रोख काढले व मोरारजी कंपनी येथे शेडकडे जात असता, त्याची प्रकृती ठिक वाटत नसल्याने शेडच्या बाजुला झोपला झोपे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयांनी फिर्यादी झोपेत असता खिशातुन रोख २३,०००/– रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ४८५ बन्सोड मो. नं. ९५११८१७१८९ पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत पारशिवनी वैशाली बाजार, रेडीमेड दुकान येथे दिनांक २२/११/२०२२ चे ००.१५ वा. ते ०३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– राहुल रमेश कोचर, वय ३९ वर्ष, रा. साइ ले आउट, पारशिवनी याचे पारशिवनी ते रामटेक रोडवरील वैशाली बाजार नावाचे कपडयाचे शोरूम दुकानाचे कोणीतरी अज्ञात चोराने मागील भागास एक लोखंडी मोठी कैची, एक लोखंडी सब्बल व लोखंडी कापण्याची इलेक्ट्रीक कटर मशिनसह येवुन चोरी करण्याचा प्रयत्न केला. तसेच डॉ. इरफान यांचे दवाखान्यात खोलीत प्रवेश करून तसेच नामे– सुनिल भड यांचे मोटार सायकल शोरूमचे शटर उघडण्याचा व चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार संदीप कडु, बं. नं. ४१८ मो. नं. ९८२३७२२४१८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**